ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# सातारा जिल्ह्यातील लोकदैवते व लोकसंस्कृती

**डॉ. सौ. कांचन नलावडे**
मराठी विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

## प्रस्तावना

लोकसाहित्य हा लोकमनाचा आविष्कार असतो. लोकसाहित्य वाङ्मय निर्मितीचा कोणी एक कर्ता नाही. ही निर्मिती कोणत्याही एका व्यक्तीची नसून ती लोकांची असते. ती एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत मौखिक परंपरेने चालत येते. लोक साहित्यात मौखिक आविष्कारात कथा, गीते, वाक्प्रचार, म्हणी, उखाणे, आहाणे यांचा समावेश होतो तर भौतिक लोकसंस्कृतीच्या आविष्कारात पारंपरिक कौशल्ये आणि तंत्रांचा समावेश होतो. लोककला, लोकनृत्य, लोकवाद्य, शिल्प व मूर्ती इ. प्रयोजसिध्द ज ला आणि लोकरूढी, लोकभ्रम, लोकसमज, लोकतत्त्वे, लोकविधी यांची निर्मिती देखील अनामिकांकडून केव्हातरी झालेली असते. लोकसाहित्य या संकल्पनेची व्यापकता पाश्चात्य व भारतीय अभ्यासकांनीही व्यक्त केलेली आहे.

## लोकसाहित्य - लोकसंस्कृती अनुबंध

लोकसाहित्य हे लोकजीवनाशी, लोकसंस्कृतीशी निगडीत असते. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचा अत्यंत जवळचा संबंध असतो. मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या शारीरिक गरजा आहेत. तशा कला आणि साहित्य या मनाच्या गरजा आहेत. ही मानवाची गरज सांस्कृतिक लोकाविष्कारातून पूर्ण होते. संस्कृती ही मानवाची स्वतःची निर्मिती आहे. संस्कृती विही-न मानव अशी कल्पना करताच येत नाही. संस्कृतीमध्ये परंपरेकडून स्वीकारलेले संचित, अनुभव आणि व्यवहार, मानसिक आणि क्रियात्मक व्यवहार या सर्वांचा समावेश होतो. लोकसाहित्य हे समूहमनाच्या भावभावना व विचार यांची अभिव्यक्ती असते. त्यातूनच लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. मानवी जीवनाच्या बदलाबरोबरच लोकसंस्कृती ही बदलतच असते. संस्कृती ही संकल्पना बदलती असते याचे विवेचन करताना डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात " संस्कृती ही मानवी जीवनाला व्यापून राहिलेली गोष्ट आहे. या संस्कृतीद्वारे मानव आपल्या भोवतालच्या सर्व घटकांशी समायोजन करीत असतो. सभोवतालच्या काही गोष्टींचा अंगिकार करुन नव्या संस्कृतीची तो जडणघडण करतो. संस्कृतीकरणाची ही प्रक्रिया अखंडपणे सुरू असते. कदाचित त्याला आपण नव्या संस्कृतीचा स्वीकार करीत आहोत याची जाणीव होत नसेल, पण जेव्हा तो भिन्न संस्कृतीच्या संपर्कात येतो तेव्हा त्याच्या लक्षात येते की, आपण बदलत्या काळाबरोबर खूप बदलून गेलो आहोत"[१] यावरुनच संस्कृतीची देवाण-घेवाण ही सतत चालूच असते आणि याचे शब्दरुप म्हणजे लोकसाहित्य असते हे लक्षात येते. याचप्रकारे लोकसंस्कृतीचे व्यापक स्वरूप सांगताना डॉ.शरद व्यवहारे म्हणतात, "लोकसंस्कृतीच्या प्रवाहात अनेक अंतःप्रवाह सहजपणे मिसळले आहेत, कृषिवलांची जीवनधारा, भटक्या लोकसमूहाची जीवनधारा, पारंपारिक लोकसंस्थांचे जीवनविशेष, ग्रामरचनेतील पांरपरिक व्यावसायिकांची जीवनधारा, मौखिक वाङ्मयाचा अंतःप्रवाह त्याचप्रमाणे लोककला इ. अंतप्रवाह लोकसंस्कृतीत आपले वेगळेपण आपला ' रंग ' मिसळून प्रवाहित राहिलेले आहेत."[२] यावरुन लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या व्यापक प्रवाहाचे दर्शन घडविते हे दिसून येते.

## लोकसंस्कृती आणि लोकदैवते

महाराष्ट्रातल्या लोकसंस्कृतीत पिढ्यानपिढ्या आणि परंपरेनुसार अनेक लोकदैवते मानली जातात. लोकसंस्कृतीचा गाभा असलेली लोकदैवते आणि त्याचे विधी यांना परंपरेनुसार समाजात महत्त्वाचे स्थान असते. याविषयी डॉ. द. ता. भोसले म्हणतात, "परंपरेने चालत आलेल्या कला, खेळ, कुलाचार, धार्मिक विधी, देवदेवतांचे उपासक यांचे लोकसंस्कृतीशी नाते घट्ट बांधलेले असते."[३] लोकसंस्कृतीमध्ये वेगवेगळ्या देवदेवतांची उपासना, पूजा-अर्चा, करण्याची पध्दती प्रदेशानुसार वेगवेगळी असलेली दिसून येते. ग्रामजीवनाचे आजही लोकसंस्कृतीशी नाते घट्ट असलेले पहायला मिळते. "म्हणून खेड्यापाड्यात खंडोबा, ज्योतिबा, भैरोबा, सिदोबा, म्हसोबा, रवळनाथ, यल्लमा, रेणुका, काळुबाई, या देवदेवतांची मंदिरे तयार झाली"[४] आज ही लोकदैवते ग्रामदैवते म्हणून नावारुपाला आलेली आहेत. लोकमानसामध्ये त्यांना श्रध्देचे स्थान मिळालेले आहे. त्याचबरोबर लोकदैवते आणि धार्मिक भावना यांचा संबंध स्पष्ट करताना डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात, "धर्म भावनेच्या मुळाशी सामाजिकता असते. किंबहुना हा धर्माचा प्रधान

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

जुण असतो. माणसांनी देवाची कल्पना याच धारणेने केली. उपद्रव देणाऱ्या आणि उपकारक ठरलेल्या निसर्गातील अतिमानवी शक्तींना आदिमानवाने देव मानले आणि त्यांची पूजा केली. देवदेवतांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञासारजे विधी निर्माज झाले. लोकमानसातून या दैवतांची निर्मिती झालेली आहे."[५] प्रस्थापित नसलेले लोकसमूह श्रध्देने आपली दैवते मानतात हीच लोकदैवते होत. वेगवेगळ्या लोकसमूहांची अनेक लोकदैवते असतात. बहुधा ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या जीवनातच लोकदैवतांचे प्रमाण अधिक प्रमाणात पहावयास मिळते. नागरी जीवनाचे संस्कार जरी या लोकसमूहावरती झाले तरीही त्यांच्या लोकदेवतांबद्दलच्या असणाऱ्या श्रध्दा नाहीशा होत नाहीत. ग्रामीण भागातील लोकांचे जीवन हे कृषिप्रधान व्यवस्थेवरती आधारलेले असते. ग्रामजीवन हे जमिनीतून पिके घेण्यापुरते मर्यादित नसून निसर्ग संवादीही असते. यामुळे या लोकसमूहाच्या भौतिक आणि भावनिक गरजातूनच तेथील लोकदेवते निर्माण होतात. निसर्गातील काही शक्ती अनुकूल प्रतिकूल असे कार्य करीत असतात. या भावनेतूनच त्या शक्तीचे दैवतीकरण केले जाते. या लोकदेवतांमुळे ते ज्या भागांमध्ये असतात तेथील समाजजीवन, संस्कृती, रूढी, प्रथा, परंपरा प्रभावित होत असतात.

## सातारा जिल्ह्यातील लोकदैवते

भारतीय संस्कृती ही निसर्गावर आधारित असणारी संस्कृती आहे. निसर्गामध्ये आढळणाऱ्या विविध बदलांना अनुसरून लोकांनी सण व उत्सव साजरे केले. याच निसर्गातील इष्ट आणि अनिष्ट घटकांना की जे माणसाच्या आकलन शक्तीच्या पलीकडे होते अशा घटकांना माणसाने धार्मिक रुप प्रदान केले आणि त्यातूनच लोकदैवते निर्माण झाली. ही लोकदैवते विशिष्ट समाजाच्या सांस्कृतिक संवर्धनासाठी कार्यरत असताना दिसतात. या लोकदैवतांवर अनेक उपासकांच्या उपजिवीका अवलंबून असतात. अनेक श्रध्दाळू भाविक या ठिकाणी भेट देतात. सातारा जिल्ह्यामध्ये अनेक लोकदैवते आहेत. यामध्ये औंधची यमाई, कराडची उत्तरालक्ष्मी, मांढरदेवची काळूबाई, फलटणची जब्रेश्वरी, भाटमरळीची मंगळाई, देऊरची मुधाई, कुसरूडची मळाई, जखिणवाडीची जखणाई, प्रतापगडची भवानी, बावधनची सोनजाई, सैदापूरची रेणुका, मणदुऱ्याची जाणाई यासारख्या मातृदेवता तर पालीचा खंडोबा, म्हसवडचा सिध्दनाथ, शिंगणापूरचा शंभूमहादेव, जानगुडेवाडीचा नाईकबा, येराडचा येडोबा, कुरोलीचा सिध्देश्वर, मलवडीचा खंडोबा, येवतेश्वरचा येवतेश्वर, वाईचा गणपती आणि बहिरोबा, मेणवलीचा मणेश्वर, दिवशीचा धारेश्वर, कोळयाचा नरसोबा, गुरसाळ्याचे रामलिंग व सोमलिंग, तारगावचा तारकेश्वर, पाटेश्वरचा पाटेश्वर, पुसेगावचा सिध्दनाथ, बहुल्याचा बहुलेश्वर, बावधनचा भैरवनाथ, मायणीचा सिध्दनाथ, साताराचा बहिरोबा अशा पितृदेवतांचा समावेश होतो. सुमारे २८० लहान मोठ्या यात्रा या जिल्ह्यामध्ये दरवर्षी होत असतात. महाराष्ट्रातील अनेक भाविक या यात्रांच्या निमित्ताने तीर्थक्षेत्रांना भेटी देतात या यात्रांना लाखो भाविकांची गर्दी होत असते.

सातारा जिल्हा हा भक्ती आणि शक्तीचे ऐक्य असणारा जिल्हा. सातारा जिल्ह्यातील सर्वच लोकदैवतांचा विचार न करता ज ाही प्रमुज लोज दैवतांचा विचार या निबंधात करण्याचा मानस आहे. याच जिल्ह्यातील प्रतापगडावर भवानी मातेने छत्रपती शिवाजी महाराजांना संकटसमयी दृष्टांत आणि तलवार देऊन अधर्माविरुध्द लढण्याचे बळ दिले. औंधची यमाईदेवी ही पंतप्रतिनिधींच्या घराण्याची कुलदेवता आहे. एका आख्यायिकेनुसार औंध येथे पूर्वी घनदाट अरण्य होते. त्यात औंधासूर नावाचा राक्षस राहत होता. त्याचा यमाई देवीने वध केला. त्याच्या नावावरुन या गावास औंध नाव पडले असावे. यमाईदेवीचे एक मंदिर गावाच्या उत्तरेस असलेल्या प्रतिनिधींच्या वाड्याजवळ आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून समोर औंधेश्वराची मूर्ती आहे. गाभाऱ्यात देवीच्या दोन मूर्ती असून एक पाषाणाची व दुसरी पंचधातूची आहे. मूर्तीच्या पाठीमागे चांदीची प्रभावळ आहे. मंदिरावर दगडविटांचे शिखर आहे. औंध गावच्या नैऋत्येस २४० मीटर अंतरावरील टेकडीवर यमाई देवीचे मूळपीठ असलेल्या ठिकाणी तिचे दुसरे मंदिर आहे. पायथ्यापासून मंदिरापर्यंत पायऱ्या आहेत. मंदिराभोवती तटबंदी असून तिला दहा बुरूज आहेत. संपूर्ण मंदिर दोन फूट उंचीच्या दगडी जगतीवर उभे आहे. मुखमंडपाचे छतावर मध्यभागी सुर्यफूलाची प्रतिमा असून त्याच्या आजुबाजूस कोरीव काम आहे. गाभाऱ्यात यमाईदेवीची पाषाणातील पूर्वाभिमूख मूर्ती आहे. देवीची यात्रा पौष पौर्णिमेपासून अमावस्येपर्यंत असते.

शिखर शिंगणापूर हे सातारा जिल्ह्याच्या माण तालुक्यातील एक स्वयंभू शिवस्थान आहे. "इ.स.पूर्व ४ थ्या शतकाच्या आधी मानीष शंभू माहात्म्यामध्ये या मंदिराचा व येथील विविध स्थानांचा उल्लेख आलेला आहे. हा ग्रंथ श्री. ज्ञानेश्वर बडवे यांचेकडे परंपरेने आलेला आहे."[६] शिंगणापूर गाव डोंगराच्या पायथ्याशी असून ते देवगिरीच्या सिंघण यादवाने वसविलेले असावे. डोंगरावरील शिवमंदिरही त्यानेच बांधले असावे. शिवमंदिराकडे जाताना शांतिलिंग स्वामींची समाधी व खडकेश्वराचे मंदिर लागते. धवलगिरी किंवा स्वर्णाद्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिखरावरील तटबंदीयुक्त शिवमंदिराला चार दरवाजे आहेत. आवारात अनेक दीपमाळा, मुख्य मंडपात पाच दगडी नंदी, गाभाऱ्यात शिवशक्तीची प्रतीके मानलेने दोन स्वयंभू लिंगे आहेत. मंदिराच्या

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

पश्चिमेकडे बली महादेवाचे, म्हणजेच अमृतेश्वर हे हेमांडपंथी मंदिर आहे. महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते. चैत्र शुध्द प्रतिपदेपासून दहा दिवस महादेवाचा मोठा उत्सव चालतो. नवस बोलणारे भक्त अभिषेकासाठी पाण्याच्या कावडी पायथ्यापासून अवघड वाटेने आणतात. ही 'भुत्या तेल्याची कावड' म्हणजे दोन मोठे रांजणच असतात. या उत्सवासाठी मराठवाड्यातील भातंगडी गावातून १२ मी. लांबीची काठी आणली जाते. शिखर शिंगणापूरला शंभू महादेव हे छत्रपतींचे कुलदैवत आहे. चैत्रशुध्द अष्टमीला शिवपार्वतीचा प्रतिकात्मक विवाह सोहळा संपन्न होतो. महाराष्ट्राचा कुलस्वामी शिखर शिंगणापूरला सातारा जिल्ह्यात आहे. हे सातारचे परमभाग्य आहे. हरिहर ऐक्य व शिव - विष्णू भक्ती यांचे मनोहर दर्शन येथे घडते.

महाराष्ट्र व कर्नाटक यातील एक प्रसिध्द लोकदैवत मल्लारी (मल्हारी) मार्तंड, मार्तंड भैरव, म्हाळसाकांत, मैलार इ. नावांनीही खंडोबा प्रसिध्द आहे. रा. चिं. ढेरे यांच्या मते "हे दैवत अकराव्या शतकापासून विशेष लोकप्रिय आहे. ब्राह्मणापासून तो धनगर रामोश्यापर्यंत खंडोबाचे उपासक आढळतात. तो अनेकांचे कुलदैवतही आहे. मणी आणि मल्ल ह्या दैत्यांच्या नाशासाठी शंकराने मार्गशीर्ष शुध्द षष्ठीस मार्तंडभैरवाचा अवतार धारण केला अशी कथा 'मल्हारी - माहात्म्यम' ह्या संस्कृत ग्रंथात आहे."[७] "चतुर्भुज : कपाळाला भंडार, हातात डमरू, त्रिशूल, खड्ग व पानपात्र, वाहन घोडा आणि म्हाळसा व बाणाई ह्या भार्या असे त्याचे वर्णन आढळते. रविवार, सोमवती अमावस्या, चैत्री, श्रावणी व माघी पौर्णिमा तसेच चंपाषष्ठी हे दिवस खंडोबाच्या उपासनेत महत्त्वाचे मानले जातात. बेल भंडार व दवणा ह्या वस्तूंना त्याच्या पूजेत विशेष महत्त्व आहे. "[८] सातारा जिल्ह्यातील पाली हे गाव पुजे-बंगळूर महामार्गावरील काशिळ गावापासून पश्चिमेला ७ कि.मी. वर तारळी नदीच्या दोन्ही तीरावर वसलेले आहे. याचे मूळ नाव राजापूर असून येथील खंडोबाचे मंदिर प्रसिध्द आहे. यास खंडोबाची पाल म्हणूनही ओळखतात. एका आख्यायिकेनुसार या गावात पालाई नावाची गवळण खंडोबाची भक्त होती तिच्या नावावरुन गावास पाल हे नाव पडले. पौष महिन्यात येथे खंडोबाची मोठी यात्रा भरते. यात्रेला फार दूरवरुन ही भाविक येतात. यात्रेच्या वेळी नदीचे पात्र कोरडे असल्याने यात्रेकरू नदीच्या पात्रात मुक्काम करतात. यात्रेच्या दिवशी उत्सवमूर्तीस पितळी पत्र्याचे मुखवटे घालून हत्तीवरुन मिरवणूक काढली जाते. यात्रा चार दिवस असते. दरवर्षी खंडोबाचा विवाह पालीला होत असला तरी हळद लागते मलवडीला व जेजुरीला त्यांचा प्रपंच सुरू होतो असे हे सर्वसामान्य जनतेचे कुलदैवत.

'यळकोट यळकोट जय मल्हार।'

भंडाऱ्या खोबऱ्याची उधळण आणि दणक्यात साजरा होणारा खंडोबा - म्हाळसा यांचा विवाह यामुळे पालीला अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. येथे लाखो लोक यात्रेसाठी जमतात.

मांढरदेव हे वाईच्या उत्तरेला ९ कि. मी. वर महादेव डोंगर रांगेत आहे. काळूबाई देवीच्या स्थानाकरिता प्रसिध्द आहे. काळूबाई देवीचे साधे मंदिर असून ही येथील ग्रामदेवता आहे. सन १८५० मध्ये मंदिरावर शिखर बांधले व १९३५ मध्ये त्याचे नूतनीकरण केलेले आहे. मुख्य मंदिर पूर्वाभिमुख असून त्याच्या ईशान्येस मांगीबाबा मंदिर तर वायव्येस गोंडीबाबा मंदिर आहे. गोंडीबाबा मंदिराच्या बाजूलाच गंगाजीबाबा मंदिर आहे. दक्षिणेकडील दालनात उत्तराभिमुख मारूतीची मूर्ती आहे. मध्यभागी काळूबाई देवीची स्वयंभू मूर्ती एका मखरात असून ती चांदीच्या पत्र्याने मढविलेली आहे. येथे पौष शुध्द १५ ला भरणाऱ्या देवीच्या यात्रेस मोठ्या प्रमाणावर यात्रेकरू येतात.

म्हसवडचे सिध्दनाथ मंदिर हे गावाच्या पश्चिमेला आहे. मूळ मंदिर १२ व्या शतकात बांधलेले आहे. हे मूळात पाताळलिंगी आहे. साधारणपणे १६ किंवा १७ व्या शतकात या मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला. त्यावेळी गर्भगृहाची आतून उभारणी करताना काही उंचीवर पुन्हा एक अधिष्ठान तयार करुन त्यावर आज दिसते ती सिध्दनाथाची मूर्ती बसविण्यात आली आहे. सिध्दनाथाची मूळ मूर्ती भैरवाची व जोगाईची मूळ मूर्ती पार्वतीची आहे. मूर्तीखाली भुयारात शिवपिंड आहे. मूर्तीच्या पाठीमागे पितळी पत्र्याची प्रभावळ आहे.

## सारांश

सातारा जिल्ह्यातील या लोकदैवतांना लोकजीवनामध्ये महत्त्वाचे स्थान असलेले दिसून येते. लोकदैवतांविषयी एक आदर, श्रध्दाभाव, लोकविश्वास आणि विशिष्ट प्रकारची भिती ही लोकमनात असलेली पहावयास मिळते. या दैवतांमुळेच आपल्या कुटुंबाचे समाजाचे भले होते. आपल्या पांढरीवर येणारी संकटे या देवतांची पूजा केल्यामुळेच दूर होतात. अशी एक लोकांच्या मनाची भावनाच तयार झालेली आहे. या देवता सदैव आजूबाजूच्या परिसरात संचार करीत असतात व आपले रक्षण करीत असतात असा लोकविश्वास भक्तांच्या मनात रुजलेला आहे. यामुळे लोकदेवतांना लोकमानसाच्या भावविश्वात आजही श्रध्देचे स्थान असलेले दिसून येते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**संदर्भ**

१. शिंदे डॉ. विश्वनाथ - लोकसाहित्य मीमांसा (भाग पहिला), स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९९८, पृ.
२. व्यवहारे डॉ. शरद - लोकसाहित्य (संकल्पना व स्वरुप), कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी १९९९, पृ. २९
३. भोसले द. ता. - 'लोकसंस्कृती : स्वरुप आणि विशेष', पद्मजंधा प्रज ाश-न, पुजे, प्रथमावृत्ती २००४, पृ. १५
४. तत्रैव - पृ. १६
५. शिंदे डॉ. विश्वनाथ - लोकसाहित्य मीमांसा (भाग पहिला), स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९९८, पृ. १२
६. मेजर प्रोजेक्ट - सातारा जिल्ह्यातील लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचा अभ्यास, मराठी विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा. मार्च १९९६
७. ढेरे रा. चिं. - खंडोबा, पुणे, १९६१.
८. प्रमुख संपादक तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई. १९७६, पृ. ५१७